# 'मेट्रो' लिफ्टसाठी कंत्राटदारांची नियुक्ती

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या भूमिगत प्रकल्पातील बोगद्यांची कामे प्रगतीपथावर असताना आता १४ स्थानकांत लिफ्ट यंत्रणा बसवण्यासाठी कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकल्पाला अर्थपुरवठा करणाऱ्या जपानच्या 'जायका' या संस्थेसोबतच्या करारानुसार कफ परेड ते सिद्धिविनायक या १४ मेट्रो स्थानकांसाठी लिफ्ट यंत्रणा उभारली जाणार आहे.

जॉन्सन लिफ्टस् संयुक्त एसजेईसी कॉर्पोरेशन, चायना कंपनीला हे कंत्राट देण्यात आले. १४ स्थानकांसाठी एकूण २०५ लिफ्ट प्रणालींचे डिझाइन, निर्मिती, पुरवठा, मांडणी , चाचणी, प्रत्यक्ष कार्यशीलता आणि अन्य कामांचा यात समावेश आहे. त्याचबरोबर अत्याधुनिक तंत्रज्ञान, दर्जा आणि मजबुती यास कायद्याच्या बंधनात राहून प्राधान्य दिले जाणार आहे. हे सारे करत असताना प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होईल यावर आमचा कटाक्ष आहे, असे 'मेट्रो-३'च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.